REGISTERED No. B. 9434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ७ जून, १९४४ अंक २३

★ नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी ★

चिनाब, लाइमज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस, मॅंगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेल्स, टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे स्टॉकिस्ट.

शाखा:— माणिक चौक, अहमदनगर ★ हेड ऑफिस:— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा–बुधवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone
779




TELEGRAM
Guest House
Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

### अपोलो मिल्स लि.

वरील गिरणीनें १९४३ सालीं ५० लक्ष रुपये वसूल भांडवलावर ८०½ लक्ष रुपये नफा दाखविला. ( त्यांतून कर व घसारा यांची तरतूद व्हावयाची आहे ) भागीदारास १८½% डिव्हिडंड मिळालें.

### बँकांत २८,००० स्त्री नोकर, परंतु एकहि मॅनेजर नाहीं

ग्रेट ब्रिटनमधील बँकांतून २८,००० स्त्रिया नोकरी करीत आहेत, परंतु त्यांपैकीं एकीसहि अद्याप शाखेचे मॅनेजर नेमण्यांत आलेलें नाहीं. कांहींनी इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या परीक्षा दिलेल्या आहेत, तर कांहीं गेल्या महायुद्धापासून कामावर आहेत. बहुतेक स्त्री-नोकर विवाहाची वाट पहातच नोकरी करतात हें खरें असलें तरी कित्येक स्त्रिया बँकिंगचा व्यवसाय करण्यास तयार आहेत. परंतु, प्रमुख बँका आपलें धोरण बदलण्यास तयार नाहीत.

### भारत बँक लि.

वरील बँकेच्या शाखांचे संख्येंत ३१ मार्च अखेरच्या तिमाहींत ८५ शाखांची भर पडून त्यांची संख्या १८६ झाली. ठेवींची रक्कम ५½ कोटींवरून १४ कोटींवर गेली. क्यु. प्रेफरन्स भागीदारांस ६% डिव्हिडंड मिळालें, परंतु ऑर्डिनरी भागीदारांस कांहीं डिव्हिडंड मिळालें नाहीं.

### दि प्रीमिअर मोटर कं. लि.

वरील नांवाची ३½ कोटि रुपये अधिकृत भांडवलाची कंपनी उभारण्यास सरकारनें शेठ वालचंद हिराचंद ह्यांस परवानगी दिली असून कंपनी लवकरच नोंदण्यांत येईल. मोटरगाड्यांचें उत्पादन हा तिच्या स्थापनेचा हेतु आहे. मॅनेजिंग एजन्सींत शेठ वालचंद, धरमसी खटाव व तुळशीदास किलाचंद हे तिघे आहेत.

### आणखी एक मोठी बँक

श्री. नारायणलाल बन्सिलाल ह्यांच्या नेतृत्वाखालीं बँक ऑफ जयपूर लि. नांवाची, ५ कोटि रुपये अधिकृत व १½ कोटि रुपये वसूल भांडवलाची बँक लवकरच स्थापन होणार आहे.

### १९४२ मधील आयुर्विमा

१९४२ मधील आयुर्विम्याच्या व्यवसायाचा सरकारी अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यांतील महत्त्वाचे आकडे खालीं दिले आहेत.

| | नवीन कामाच्या पॉलिसींची संख्या | विम्यांची रक्कम |
|---|---|---|
| १९४१ | २००,०००, | ३९½ कोटि रु. |
| १९४२ | १,७८,००० | ४२¾ कोटि रु. |

खर्चाचें प्रमाण २७·४% वरून २६·७% वर आलें व लाइफ फंडांत ७ कोटि, १५ लक्ष रुपयांची भर पडली.

### हिंदुस्थान सरकारचें नवें कर्ज

हिंदुस्थान सरकारनें अल्पमुदतीचें ५० कोटि रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे. ह्या कर्जावरील व्याजाचा दर २½% असून परतफेड १९४८-५२ मध्यें होईल.


**Deccan Institute Of Commerce, Poona**

( Recognised by Government ).

Classes for the 1944–45 Session begin on Saturday the 1st July. Students admitted for G. D. C. & C., L. C. C., D. Com. (I. M. C.), R. A. (1st Part), G. D. C. & A., Shorthand and Typewriting. Morning and evening classes. Highly qualified and experienced staff. Prospectus free on application.

592/3 Budhwar Peth, Opp. New English School, POONA. } Secretary.

D. E. SOCIETY'S

**Brihan Maharashtra College of Commerce, Poona 4.**

The College reopens on the 20th June 1944. Admissions to the F. Y. Com., I. Com. and B. Com. classes will begin from 10th June. Applications for admission to the College and hostel should be made to the Principal in the prescribed form. The College Prospectus containing the application form will be sent on receipt of postage stamps worth two annas.

D. G. Karve,
*Principal.*

वाढत्या पुण्याचें वाढतें वैभव !

७० प्लॉट्सची

रामबाग कॉलनी समोर × × × हवेशीर

**आयडियल कॉलनी**

मोठ्या सरकारी रस्त्यावर × × × सोयिस्कर

प्रत्येक प्लॉटची किंमत रु. ८०० ते रु. १५००

प्रत्येक प्लॉटचें क्षेत्रफळ अकरा हजार स्के. फूट

म. य. दातार

खालील पत्त्यांवर चौकशी करावी म्हणजे प्लॉटस दाखविण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

१ दया-निवास कॉमनवेल्थ कॉलनी, नारायण पेठ, पुणें २
भेटण्याची वेळ : सकाळीं ७ ते ८॥ व रात्रौ ८ ते ९

२ व्यवस्थापक, मॉडर्न कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट कंपनी, जीवनछाया,
भेटण्याची वेळ—सकाळीं ९ ते ११

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १७८ | पुरवठा–इटलीमधील युद्ध आणि नवी आघाडी–ऐक्य विशेषांक | |
| २ जागतिक चलन परिषद् | १७९ | ७ आग व स्फोट ह्यांतील नुकसानीची भरपाई ... | १८२ |
| ३ व्याजांतून कराची कपात | १८० | ८ शेतांचें उत्पादन वाढविण्यासाठीं यंत्रसामुग्री ... | १८३ |
| ४ नवें हिंदी रेडिओ केंद्र | १८० | | |
| ५ बेकऱ्या सुरक्षिततेंत वाढ | १८० | | |
| ६ स्फुट विचार ... ... | १८१ | | |
| हिंदुस्थान सरकारचें नियोजन खातें–स्वस्त कापडाचा | | | |

अर्थ

बुधवार, ता. ७ जून, १९४४

## जागतिक चलन व्यवस्था परिषद्

### हिंदुस्थानास निमंत्रण

पुढील महिन्याचे प्रारंभीं अमेरिकेमध्यें जागतिक चलन परिषद् भरणार आहे. तिच्या चर्चेंत भाग घेण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें आपले प्रतिनिधी पाठवावे ह्या आशयाचें निमंत्रण त्यास प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं पाठविलें असून त्याचा स्वीकार करण्यांत आला आहे. सदरहु परिषदेंत मित्रराष्ट्रें आणि त्यांच्या पक्षाचे देश आपापले प्रतिनिधी पाठवणार आहेत. त्यांच्या बरोबरीनें हिंदुस्थानास चलन परिषदेंत स्थान देण्यांत आलें आहे. ह्यासंबंधांत हिंदुस्थान सरकारनें माहिती प्रसिद्ध केली आहे तिचा उल्लेख येथें करणें आवश्यक आहे. अमेरिकेंत भरणाऱ्या परिषदेंत कोणते प्रश्न चर्चेसाठीं येणार आहेत, ह्याचें विवेचन आम्हीं मागें केलेंच आहे. युद्धोत्तर काळांत राष्ट्राराष्ट्रांत होणाऱ्या देवघेवींचे, हुंडणावळीचे व भांडवलाच्या आयात-निर्गतीचे अवघड प्रश्न उद्भवतील त्यांची वेळींच समाधानकारक व्यवस्था लावून मागील महायुद्धानंतर अनुभवास आलेले घोटाळे वाचवावे ह्या हेतूनें इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत तज्ज्ञांनीं योजना आखल्या असून त्यांवर दीर्घकालपर्यंत विचारविनिमयहि केला आहे. ह्या योजनांच्या महत्त्वाच्या तपशिलाबाबत अमेरिका आणि इंग्लंड ह्यांचेमध्यें मतभेद उद्भवले आहेत. तथापि आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्थेच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वांस दोन्हीं देशांत सामान्यतः मान्यता मिळाली आहे. रशियाचें मतहि अजमावण्यांत आलें आहे आणि तें अनुकूल असल्याचें दिसून आलें आहे.

युद्धोत्तर परिस्थितींतील आर्थिक पुनर्घटनेमध्यें आवश्यक होणारा आंतरराष्ट्रीय चलननिधी निर्माण करणें आणि त्याकरितां आवश्यक वाटल्यास शक्य तर एखादी आंतरराष्ट्रीय बँक स्थापन करणें हा अमेरिकेंत भरावयाच्या परिषदेचा मुख्य हेतु आहे, असें हिंदुस्थान सरकारच्या पत्रकांत म्हटलें आहे. ह्या बाबतींतली योजना आखतांना तिच्या संबंधांत आतांपर्यंत झालेली चर्चा व विचारविनिमय ह्यांचा आधार घेतला जाईल. परिषदेच्या कार्यक्रमांत भाग घेणाऱ्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींस अंतिम व बंधनकारक मत देण्याचा अधिकार असणार नाहीं आणि तीमध्यें सामान्यतः मान्य झालेले निर्णय स्वीकारणें किंवा न स्वीकारणें प्रत्येक राष्ट्रीय सरकारच्या मर्जीची गोष्ट राहील, हें प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांच्या निमंत्रणपत्रिकेंतच स्पष्ट करण्यांत आलें आहे. तेव्हां हिंदुस्थानचे प्रतिनिधी ह्या देशाच्या नांवानें परिषदेच्या निर्णयास अनुमति देऊन टाकून परत येतील अशी भीति वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. परिषदेचे निर्णय हिंदुस्थानच्या मध्यवर्ती कायदेमंडळापुढें मांडण्यांत येतील आणि त्यांच्या अभिप्रायास अनुसरूनच येथील सरकारास स्वतःचें मत अखेर बनवावें लागेल. जगांतील सर्व देशांस मान्य होईल अशी आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्थेची योजना अमेरिकेंत भरणाऱ्या परिषदेंत बनवली जाईल आणि जागतिक स्वास्थ्य व शांतता ह्यांस ती पोषक होईल अशी आशा आमच्या सरकारनें प्रगट केली आहे.

चलनपरिषदेसाठीं हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणून फडनवीस सर जरेमी राइस्मन, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर सर चिंतामण देशमुख, सरकारचे आर्थिक सल्लागार, सर थिओडोर ग्रेगरी, सर षण्मुखम् चेट्टी व टाटा सन्सचे डायरेक्टर, मि. ए. डी. श्रॉफ ह्यांची निवड करण्यांत आली आहे, ती योग्य आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. युद्धोत्तर जागतिक चलनव्यवस्थेच्या संबंधानें इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या वतीनें पुढें मांडण्यांत आलेल्या योजनांची चर्चा हिंदुस्थान सरकारच्या कार्यकारी मंडळाच्या उपसमितीनें व आर्थिक सल्लागार समितीनें अलीकडे केली असून, ह्या देशाचें धोरण प्रस्तुत बाबतींत काय असावें हें स्थूल रीतीनें ठरवलें आहे. त्यास धरूनच अमेरिकन परिषदेस जाणाऱ्या हिंदी प्रतिनिधींची भूमिका राहील आणि सर्वसाधारणपणानें व्यक्त झालेलें हिंदी लोकमतहि ते ध्यानांत ठेवतील अशी अपेक्षा आहे. हिंदुस्थानच्या हितसंबंधांचें योग्य रक्षण जिनें होईल आणि ह्या देशापुढें चलनविषयक प्रश्न युद्धसमाप्तीनंतर उभे रहातील ते समाधानकारक रीतीनें सोडवले जाण्यास सहाय्यक होईल अशी जागतिक चलनव्यवस्था मान्य करण्यास प्रत्यवाय नाहीं असा हिंदी लोकमताचा सामान्यतः सूर आहे. हिंदुस्थानचे हजार दीड हजार कोटि रुपये लंडनमध्यें युद्धसमाप्तीचे वेळीं पडून राहिले असतील ते इंग्लंडनें कसे ह्या देशास परत करावयाचे हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. युद्धामुळें आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याच्या बाकया निघतील त्यांची व्यवस्था करण्याची तरतूद चर्चेचा विषय होणाऱ्या जागतिक चलन मंडळीच्या योजनेंत अंतर्भूत नाहीं हें तिच्यामध्यें वैगुण्य आहे असें मानण्यांत येत आहे. अमेरिकन योजनेंत प्रारंभीं अशी तजवीज होती. पण तिच्या योगानें सर्वच योजना डळमळित होईल असें वाटल्यावरून ती टाकून देण्यांत आली आहे. हिंदुस्थानच्या लंडनमधल्या शिल्लकी पैशाची विल्हेवाट कशी करावयाची ह्या प्रश्नाचा निकाल यापुढें ब्रेटब्रिटन व हा देश ह्यांस परस्पर करावा लागेल अशी कल्पना आहे. तथापि, हा प्रश्न चलन परिषदेंत उपस्थित करण्यास हिंदी प्रतिनिधींस मुभा आहे. हिंदी लोकांस स्वतःचें आर्थिक धोरण ठरवण्याचें स्वातंत्र्य नसल्यानें हिंदुस्थान व इंग्लंड ह्यांच्या हितसंबंधांत व मतांत विरोध उत्पन्न झाल्यास त्याचा अखेर निकाल कसा लागेल ह्याविषयीं चिंता वाटणें स्वाभाविक आहे. स्टर्लिंग चलनाशीं संबद्ध असलेल्या देशांचा स्वतंत्र गट रहावा असा ब्रिटिश तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. तो जागतिक चलन

व्यवस्थेच्या योजनेशी विसंगत होईल की काय अशी शंकाहि वाटत आहे. त्या योजनेप्रमाणें कारभार होईल त्यांत हिंदुस्थानास योग्य स्थान मिळावें अशी हिंदी लोकमताची मागणी आहे. सर ए. रामस्वामी मुदलियार ह्यांनीं एकदा बोलून दाखविल्याप्रमाणें होऊं घातलेल्या जागतिक चलन व्यवस्थेंत हुंडणावळीच्या दरांच्या मामुली व्यवहारांचीच तेवढी तजवीज करून भागणार नाहीं; हिंदुस्थानचा भावी व्यापार आणि औद्योगिक प्रगति ह्यांचे दृष्टीनें तिची घडण अनुकूल असली पाहिजे. चलन परिषदेंत हिंदी प्रतिनिधी ह्या देशाची बाजू जोरानें पुढें मांडतील अशी अपेक्षा करण्यास प्रत्यवाय नाहीं. हिंदी कायदे मंडळांत ह्या संबंद विषयांची चर्चा होईपर्यंत आपण कोणतीच योजना पत्करण्यास तयार नसल्याचें हिंदुस्थान सरकारनें स्पष्ट केलेंच आहे.

### व्याजांतून इनकमटॅक्सची कपात

सरकारी रोख्यांवरील व्याज देतेवेळीं त्यांतून प्राप्तीवरील कर कापून घेण्यांत येतो, परंतु लहान प्राप्तीच्या लोकांची त्यामुळें गैरसोय होते. ज्यांची १९४३-४४ मधील एकूण प्राप्ति १,५०० रुपयांपेक्षा कमी भरली, अशांना कापून घेतलेली कराची सर्व रकम परत मिळाली पाहिजे. त्याचप्रमाणें, १,५०० रुपयांवरील प्राप्तीच्या मनुष्यासहि त्याच्या प्राप्तीवर बसणाऱ्या दरापेक्षा जितक्या ज्यास्त दरानें कर कापून घेतलेला असेल, त्या प्रमाणांत रकम परत मिळाली पाहिजे. प्राप्त असलेल्या दरापेक्षां ज्यास्त दरानें १९४४-४५ मध्यें कर कापला जाऊं नये, ह्याकरितां रिफंडचा अर्ज करणारानें इनकमटॅक्स अधिकाऱ्यास आपल्या सर्व रोख्यांचा तपशील पुरवून त्याजकडे करमाफीचा किंवा कमी दरानें कर आकारणीचा दाखला मिळण्याची विनंति करावी. कर्जरोख्यांवरील व्याज जेथून घेण्यांत येतें, तेथें हा दाखला सादर करावा, म्हणजे करास पात्र नसलेल्या रोखेवाल्यांच्या व्याजांतून कर निष्कारण कापला जाणार नाहीं.

### नवें हिंदी रेडियो केंद्र

दिल्लीच्या जवळच एक नवें रेडिओ केंद्र उघडण्यांत आलें आहे. मुंबईमधील क्वीन्स रोडवरील स्टूडिओंतील कार्यक्रम ज्याप्रमाणें शहराबाहेर नेऊन तेथून ते प्रसृत केले जातात त्याप्रमाणें दिल्लीच्या ब्रॉडकास्टिंग हाउसमधील कार्यक्रम टेलिफोनच्या तारांतून नव्या केंद्रांत आणले जातात. तेथून ते ईशान्येकडे जपान, आग्नेयेकडे मलाया व इतर देश, वायव्येकडे युरोप आणि नैऋत्येकडे दक्षिण आफ्रिका, मादागास्कर इत्यादि देशांकडे पाठविण्यांत येतात. हें स्टेशन दिवसांतून वीस तास चालू राहणार आहे व त्यानें पाठविलेली शक्ति १०० किलोवॅट इतकी आहे. म्हणजे, दिवसास २० हजार युनिट वीज प्रसृत केली जाते व तिचे साहाय्यानें कार्यक्रम दूरपर्यंत पोंचतात. सर्चलाइटच्या झोताप्रमाणें ह्या शक्तीचा झोत आवश्यक त्या दिशेकडे वळवतां येतो. ह्या योगानें शक्तीची बरीच बचत होते. हा झोत इतका सामर्थ्यवान् आहे कीं तो पृथ्वी प्रदक्षणा करूं शकतो व त्या झोताचे मार्गावरील सर्व जगांतील देशांत केंद्रांतील कार्यक्रम पोचवितो. हें स्टेशन १ मे पासून चालू आहे.

## चेकची सुरक्षितता वाढवितां येईल काय ?

(ले०—श्री. पी. सी. बेंद्रे, बी. ए., एलएल. बी.)

चेकची पद्धत ही व्यापारी युगांत सुरक्षित व फार सोयीची अशी पद्धत आहे. त्यायोगें आपणांस ज्या व्यक्तींस पैसे द्यावयाचे असतील त्यांस अतीशय कमी त्रासांत व कमी खर्चांत वाटेल तेवढी रकम देतां येते. चेकची उपयुक्तता बँक व खातेदार यांचे सहकार्यानें वाढण्याजोगी आहे व त्याच दृष्टीनें खालील मुद्दा सुचवीत आहें.

खातेदारानें गिऱ्हाइकास चेक दिल्यानंतर बँकेचे नियमानुसार सदर चेक बँकेकडे वटविण्याकरितां आला तर बँकेस खातेदाराच्या खात्यांतील रकमेंतून तो चेक वटवावा लागतो. परंतु चेक देणाऱ्या खातेदारानें चेक न वटविल्याबद्दल बँकेस कळविल्यानंतर बँकेला तो चेक न वटवितां परत करतां येतो. चेक न वटविण्याबद्दल कळविल्यानंतर मुद्दा बँकेच्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजिपणामुळें अगर दुर्लक्षामुळें सदर चेक वटविला जाण्याचा संभव असतो व तसें झाल्यास बँकेच्या चुकीबद्दल खातेदारांस विनाकारण नुकसान सोसावें लागेल. या बाबतींत बँकांचा असा नियम असतो कीं, अशा तऱ्हेची जबाबदारी बँकेवर नाहीं. हा नियम अन्यायाचा व सर्वसाधारण व्यवहारास सोडून आहे. आपल्या निष्काळजीपणामुळें दुसऱ्याचें नुकसान झाल्यास तें भरून देण्याची जबाबदारी निष्काळजीमाणसांवर असणें हें वाजवी आहे. या सर्वसाधारण नियमास बँकांचा अपवाद करण्यास पुरेसें कारण दिसत नाहीं. उलट बँका म्हणून त्यांचेवर ज्यास्त जबाबदारी असावयास पाहिजे. परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थिती मात्र या उलट दिसेल. कारण बँका संघटित व आर्थिक दृष्ट्या ज्यास्त सामर्थ्यवान असतात तर खातेदार हा असंघटित व आपले हक्कासंबंधीं उदासीन व निष्काळजी असतो. व्यवहारदृष्ट्या योग्य व न्याय्य जबाबदारी, आणि विशेषत: ती जबाबदारी बँकेच्याच निष्काळजीपणामुळें उत्पन्न झालेली असलेमुळें, बँकांना स्वीकारावयास लावून त्यामुळें खातेदाराचें नुकसान झालें असल्यास त्याची भरपाई करावयास भाग पाडण्यास लागणारें सामर्थ्य व संघटना खातेदारांत नाहीं. तें उत्पन्न करून ब्यांकांना ही जबाबदारी घेण्यास भाग पाडणें हें चेकची उपयुक्तता व सुरक्षितता वाढविणेचे दृष्टीनें अगत्याचें आहे. तरी खातेदारांनीं या बाबतींत लक्ष घालून योग्य ती सुधारणा घडवून आणणें व बँकांनीं ही न्याय्य जबाबदारी स्वीकारून आपली कार्यक्षमता वाढविणें जरूर आहे. सर्व बँकांमध्यें पूर्वीपासून असाच नियम आहे अशा प्रकारचे उत्तरानें बँकांना जबाबदारी टाळतां येत मदत होईल परंतु त्यामुळें त्यांची कार्यक्षमता वाढणार नाहीं.

### हिंदी रेल्वेजसाठीं कनेडिअन इंजनें व तज्ञ

हिंदुस्थान सरकारनें ३ जुलै १९४३ रोजीं दिलेल्या ऑर्डरीस अनुसरून कॅनडामध्यें रेल्वे इंजिनें बनविण्यांत येत आहेत. १४५ इंजनें लवकरच हिंदुस्थानांत दाखल होतील. कनेडियन पॅसिफिक रेल्वे कंपनीचे तज्ञ इंजिनांच्या बनावटीवर देखरेख करीत आहेत व तीं हिंदुस्थानांत दाखल झाल्यावर तीं चालू करून देण्याची जबाबदारीहि त्या कंपनीवरच आहे त्याकरितां, कनेडिअन तज्ञ येथें येणार आहेत.

# स्फुट विचार

## हिंदुस्थान सरकारचें नियोजन खातें

आर्थिक नियोजनाच्या "मुंबई प्लॅन" ह्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या मसुद्याच्या कर्त्यांपैकीं एक प्रमुख, सर अर्देशिर दलाल, ह्यांची हिंदुस्थान सरकारनें आपल्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलांत नियोजन व संघटना खातें स्थापून त्याचेवर नेमणूक केली आहे. त्यांनीं आपल्या एका मुलाखतींत ह्या नव्या खात्याच्या कार्यक्रमाविषयीं स्पष्टीकरण केलें. मुंबई प्लॅनचें उद्दिष्ट हिंदुस्थान सरकारनें मान्य केलें असल्याचें त्यांनीं सांगितलें. नियोजनाच्या मसुद्याच्या कर्त्यांपैकीच एकाचे ताब्यांत हें नवें खातें देऊन सरकारनें मुत्सद्देगिरी दाखविली आहे. युद्धसमाप्तीनंतर मोकळ्या होणाऱ्या २० लक्ष लोकांस काम पुरविणें व सध्याचा प्रचंड युद्धखर्च थांबल्यावर निर्माण होणाऱ्या मंदीस तोंड देणें हीं महत्त्वाचीं कामें पार पाडल्यानंतरच दीर्घकालीन नियोजनास प्रारंभ करतां येईल असें सर अर्देशिर ह्यांनीं सांगितलें. वाकबगार माणसें तयार करणें, शास्त्रीय संशोधनाचा विस्तार करणें इत्यादि प्राथमिक गोष्टी पुऱ्या होण्यांतच कित्येक वर्षें जातील. नियोजित कार्यक्रमांत भांडवल, व्यापार, कारखानदारी इत्यादींचें नियंत्रण अंतर्भूत असल्याकारणानें व जबर कर आणि लोकांच्या रुढींत बदल हीं क्रमप्राप्त असल्यानें, राष्ट्रीय सरकारच त्यासंबंधांत पुढाकार व जबाबदारी घेऊं शकेल, हें उघड आहे. परंतु, त्यासाठी थांबण्याचें कारण नाहीं व सध्याच्या सरकारनें प्राथमिक तयारी करण्यांत नुकसान नाहीं असें सर अर्देशिर ह्यांचें मत आहे. मध्यवर्ती सरकार, प्रांतिक सरकारें व बिनसरकारी लोक यांचें सहकार्य ह्यांची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादन केली. आर्थिक नियोजनाची सर्वसाधारण कल्पना पुढें मांडणें व त्या कल्पनेस मूर्त स्वरूप देणें, ह्यांत किती फरक व अडचणी आहेत, हें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. वहातुक व शिक्षण ह्यासंबंधांतील युद्धोत्तर नियोजन सरकारचें तयार आहे; सार्वजनिक आरोग्य, शेती व उद्योगधंदे ह्यांची पहाणी चालू आहे. सर अर्देशिर दलाल ह्यांच्या खात्याकडून अति लवकर परिणामांची अपेक्षा करणें चुकीचें ठरेल.

---

## स्वस्त कापडाचा पुरवठा

कापडाचें उत्पादन गिरण्यांमध्यें भरपूर होत असतां पुष्कळसा माल काळ्या बाजारांत जातो आणि योग्य किंमतीनें सामान्य गिऱ्हाइकांस मिळूं शकत नाहीं. ह्या परिस्थितीवर कडक उपायांची योजना करण्याचें सरकारनें ठरवून हें धोरण अंमलांत आणण्याची व्यवस्था चालू केल्यानें सध्याची कापडाची महागाई बरीच कमी होईल अशी अपेक्षा आहे. मुंबई प्रांतांतील दहा कापड गिरण्यांच्या मालाची विक्री सरकारच्या नियंत्रणाखालीं आलेली आहे आणि कापडाचे मोठमोठे साठे त्यानें ताब्यांत घेतले आहेत. चोर बाजारावरची सरकारी मोहीम ज्या प्रमाणांत यशस्वी होत आहे त्या प्रमाणांत जनतेस विकत मिळावयाच्या कापडाचा पुरवठा वाढत आहे. सरकारच्या नियंत्रणाखालीं येणारें कापड ठराविक व्यापाऱ्यांचे मार्फत निश्चित किंमतीनें विकलें जावयाचें आहे. सरकारी नियंत्रणाखालील कापडाचा एकूण पुरवठा चालू सालीं पंचवीस कोटि यार्ड इतका होईल असा अंदाज आहे. ह्या कापडाचें उत्पादन करणाऱ्या गिरण्या आणि त्याची घाउक विक्री करणारे व्यापारी ह्यांचें सरकारी नियंत्रणाखालील व्यवस्थेनें कोणतेंच नुकसान होणार नाहीं. कारण, त्यांस आपल्या मालाचा योग्य भाव दिला जाईल. परंतु कापड विकत घेणाऱ्या जनतेस मात्र स्वस्त किंमतीनें माल मिळून लोकांची सोय व फायदा होईल. अशा रीतीनें मुंबई प्रांतांतील कापड विकत घेणाऱ्या सामान्य जनतेचे सवा दोन कोटि रुपये वांचतील असा अजमास करण्यांत आला आहे. साठेबाजी, नफेबाजी व चोरबाजार ह्यांवरील सरकारी मोहीम फलद्रूप होऊं लागल्याचें हें लक्षण आहे.

---

## इटलीमधील युद्ध आणि नवी आघाडी

गेल्या आठ पंधरा दिवसांत इटलीमधील युद्धास नवें आणि निर्णायक वळण लागलें आहे. रोमकडे जाणारे रस्ते अमेरिकन, फ्रेंच व ब्रिटिश फौजांस न जुमानतां अडवण्यांत जर्मनीस थोडें फार यश मिळाल्यासारखें दिसत होतें. परंतु आतां ही परिस्थिति निश्चयात्मक रीतीनें बदलली आहे आणि केसलरिंगला एकामागून एक ठाणें सोडून देऊन सबंध इटालिअन आघाडीवर माघार घ्यावी लागली आहे. गेल्या आठवड्यांत मित्र राष्ट्रांच्या सैन्यांनीं झपाट्यानें प्रगति केली असून ती सारखी चालूच आहे. त्यांचा प्रतिकार करण्याची धडपड शत्रू करीत आहे, पण इटलीची राजधानी रोम शहर त्यांच्या दृष्टिपथांत आलें आणि आतां तर त्यांच्या हातीं पडलें आहे. रोमच्या बचावासाठी भयंकर नुकसान सोसूनहि जर्मनीनें शिकस्त केली, पण तें एतिहासिक शहर आतां वाचत नाहीं अशी त्याचीहि खात्री झाली असली पाहिजे. रोमच्या पाडावानें हिटलरच्या प्रतिष्ठेस चांगलाच धक्का बसणार असून मित्रराष्ट्रांच्या युरोपांतील दुसऱ्या आघाडीचें काम सुकर होणार आहे. ही आघाडी केव्हां चालू होणार ह्याविषयीं मित्रदेशांत तीव्र उत्कंठा सर्वांस लागली आहे. ह्या प्रश्नाचें उत्तर बऱ्याच स्पष्टपणानें प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं दिलें आहे. जून--जुलै--ऑगस्ट ह्या तीन महिन्यांच्या पलीकडे दुसऱ्या आघाडीचा प्रारंभ जाणार नाहीं असें त्यांनीं असंदिग्ध रीतीनें सांगितलें आहे. ही नवीन चढाई कोणत्या दिशेनें किंवा दिशांनीं होणार ह्याविषयीं अनेक तर्क करण्यांत येत आहेत. त्यांपैकी कोणता खरा ठरतो हें लवकरच दिसून येईल असें मानण्यास जागा उत्पन्न झाली आहे.

---

## ऐक्य ( शैक्षणिक विशेषांक )

ऐक्य साप्ताहिकानें प्रतिवर्षीप्रमाणें शाळा कॉलेजें उघडण्याच्या प्रारंभीं ता. ३१–५–४४ चा आपला अंक शैक्षणिक विशेषांक प्रसिद्ध केला आहे. त्यांत सातारा जिल्ह्यांतील शिक्षण संस्थांची सविस्तर माहिती दिली असून स्वतंत्र असे शिक्षणविषयक लेखहि छापले आहेत. त्यांपैकी एका लेखांत श्री. ना. भा. जोशी, एम्. ए., ( हेडमास्तर, प्रतिनिधि विद्यालय, कुंडल ) ह्यांनीं सातारा जिल्ह्यांतील सर्व ॲंग्लो विद्यालयांच्या ऐक्याची कल्पना पुढें मांडली आहे.

---

## मुंबईमधील आग व स्फोट ह्यांतील नुकसानीची भरपाई

मुंबईच्या गोदींत ता. १४ एप्रिल, १९४४ रोजीं झालेल्या स्फोटामुळें व आगीमुळें झालेल्या नुकसानीच्या भरपाईची आपली योजना हिंदुस्थान सरकारनें प्रसिद्ध केली आहे. कोर्टांत दावे लागले जाऊन त्यामुळें गैरसोय होऊं नये व व्यवहारास खीळ बसूं नये, ह्या हेतूनें ही योजना आखण्यांत आलेली आहे. आग अथवा स्फोट ह्यांचा विमा उतरलेल्या मालमत्तेचा नाश झालेला असेल, अशांच्या विम्याचे पोटीं लॉईडस व इतर विमा कंपन्यांनीं सरकारनें एकूण नुकसान भरपाई देऊं केली आहे त्यापैकीं १२½% रकम सोसण्याचें स्वखुषीनें मान्य केलें आहे. म्हणजे, विमा कंपन्या व विमेदार ह्यांचेमध्यें दावे होणार नाहींत. विमा उतरलेल्या मालमत्तेच्या एकूण नुकसान भरपाईच्या १२½ रकम आपण देऊन विमा कंपन्यांनीं तडजोड केली आहे, ती सर्वसाधारण हितास पोषकच आहे. काळ्या बाजारांतील मालाच्या नाशाची नुकसानभरपाई केली जाणार नाहीं. सोनें, चांदी, घड्याळें, जडजवाहिर, चलनी नोटा, नाणीं, रोखे, तिकिटें, मालकी निदर्शक दस्तऐवज, हिशेबाच्या वह्या, नकाशे, नमुने, इत्यादींच्या नाशाची भरपाई करण्याची जबाबदारी सरकारनें स्वीकारलेली नाहीं. आगीचा व स्फोटाचा विमा ज्यांचा उतरलेला आहे, अशांच्या नाशाची १००% भरपाई सरकार करील. ह्यापैकीं १२½% रकम विमा कंपन्या सरकारास स्वखुषीनें देणार आहेत. इतर प्रकारच्या विमा उतरलेल्या मालमत्तेच्या नाशांची नुकसान भरपाईहि निश्चित करण्यांत आली आहे, त्याचप्रमाणें ज्यांचा विमा उतरण्यांत आलेला नाहीं, अशा चीजवस्तूंच्या नाशाचीहि अंशतः भरपाई करण्यांत यावयाची आहे. मालाचा सांठा, मोटारी, इत्यादींच्याहि नाशाच्या भरपाईची व्यवस्था केलेली आहे. त्याचप्रमाणें मरण पावलेल्या अथवा जायबंदी झालेल्या संबंधांत खालीलप्रमाणें रकमा दिल्या जातील:—

मदतीची रकम

| मासिक पगार अथवा प्राप्ति | अ मृत्यू रु. | ब कायम जायबंदी रु. |
|---|---|---|
| २० रुपयांपर्यंत | ९०० | १,३०० |
| २१ ते ३० | १,३०० | १,९०० |
| ३१ ते ४० | १,८०० | २,५०० |
| ४१ ते ५० | २,२०० | ३,२०० |
| ५१ ते ६० | २,४०० | ३,००० |
| ६१ ते ७० | ३,२०० | ४,४०० |
| ७१ ते ८० | ३,६०० | ५,००० |
| ८१ ते १०० | ४,५०० | ६,३०० |
| १०१ ते २०० | ५,२०० | ७,४०० |
| २०१ ते ५०० | ७,००० | ८,५०० |
| ५०१ ते १००० | ८,००० | १०,००० |
| १००० ते १५०० | १०,००० | १२,५०० |
| १५०१ ते २००० | १२,००० | १५,००० |
| २००० वर | १४,००० | १७,००० |

अंशतः जायबंदी झालेल्यांना खालीलप्रमाणें नुकसानभरपाई मिळेल:—

| हानीचें स्वरूप | वरील 'ब' मधील रकमेच्या% |
|---|---|
| उजवा हात, कोपरापर्यंत | ७० |
| डावा हात ” | ७० |
| उजवा हात, कोपऱ्याखालीं | ६० |
| पाय, गुडघ्याखालीं | ६० |
| डावा हात, कोपऱ्याखालीं | ५० |
| पाय, गुडघ्याखालीं | ५० |
| कायम पूर्ण बहिरेपण | ५० |
| एक डोळा | ३० |
| अंगठा | २५ |
| एका पायाचीं सर्व बोटें | २० |
| आंगठ्याचें एक पेरें | १० |
| तर्जनी | १० |
| पायाचा आंगठा | १० |
| इतर कोणतेंहि बोट | ५ |

### हैद्राबाद संस्थानांतील ब्रॉडकास्टिंग

हैद्राबाद संस्थानाच्या ब्रॉडकास्टिंग खात्यावर सालिना ३½ लक्ष रुपये खर्च करण्यांत येतो. हैद्राबाद येथील केंद्राचे कार्यक्रम ४११ मीटर्सवर चालू असतात व औरंगाबाद केंद्राचे कार्यक्रम ३१९ मीटर्सवर होतात. त्या दोन्ही केंद्रांची शक्ति अनुक्रमें ५ किलोवॅट व ½ किलोवॅट अशी आहे. रेडिओ मालकांकडून लायसेन्स फी घेतली जात नाहीं, परंतु त्यासंबंधांत कायदा जाहीर होण्याचें घाटत आहे. हैद्राबाद येथें एक शॉर्टवेव्ह स्टेशन उघडण्याचा बेत आहे परंतु त्यासाठी यंत्रसामुग्री मिळण्याची अडचण आहे.


## The Willingdon College, Sangli

Reopens for the academic year on 20th June 1944. The registration of names will commence on 12th June. The college provides for instruction in the Arts and Science courses in the first two years, for B. A. Degree courses pass and Honours, and for Post-graduate instruction. About a hundred seats are available in the College Hostels. Healthy surroundings, inexpensiveness and efficiency are the special features of the college.

The tuition fees are Rs. 60/- per term, and the room rent per term is Rs. 12/- for a double room and Rs. 15/- for a single room. Further information can be had on application.

Separate accommodation for Lady Students is available in the Sakhubai Gokhale Hostel on the college premises.

**Principal,**
*Willingdon College.*

## निकृष्ट शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी यंत्रसामुग्रीचा उपयोग

हिंदुस्थान सरकारच्या खास नेमणुकींतील डॉ. बर्न्स ह्यांनीं हिंदी शेतीच्या सुधारणेसंबंधीं एक टाचण तयार केलें आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें, सध्या हिंदी गव्हाचें वार्षिक उत्पादन १ कोटि, ३ लक्ष टन आहे, तें १½ कोटि टनांपर्यंत वाढवितां येणें अगदी शक्य आहे. त्याचप्रमाणें, तांदळाचें उत्पादन २ कोटि, ४० लक्ष टनांवरून ३ कोटि टनांवर नेतां येण्यासारखें आहे. चांगल्या बियांचा उपयोग केल्यामुळें ५%, खतांचा उपयोग वाढविल्यामुळें २०% व कीड आणि रोग ह्यांचा प्रतिबंध केल्यामुळें ५%, अशा रीतीनें गव्हाच्या उत्पादनाचे ३०% वाढीचा तपशील आहे. सध्याचें उत्पादन दीडपट सुद्धां करतां येण्याजोगें आहे, असा डॉ. बर्न्स ह्यांस विश्वास वाटत आहे. ज्वारी, तंबाखू, कपास, ताग, ऊंस, बटाटे, इत्यादींचें उत्पादनहि सुधारतां येईल. हिंदुस्थानांतील शेतीच्या जमीनींची अवस्था आतां अशा थराला पोचली आहे, कीं त्यांतील उत्पादनाचें प्रमाण ठरून गेलें आहे. खतांचा वाढता उपयोग करण्याच्या शक्यतेचा उल्लेख ह्यासंबंधांत त्यांनीं केला आहे.

हिंदी शेतीचें दर एकरीं उत्पादन गव्हाचे बाबतींत इजिप्तमधील उत्पादनाचे एक तृतीयांश व हॉलंडचे उत्पादनाचे एक पंचमांश, इतकेंच आहे. इटलीमध्यें प्रत्येक एकरांत हिंदुस्थानाचे मानानें चौपट तांदूळ होतो. उसाचे बाबतींत तुलना केली तर जावाची बरोबरी करण्यास हिंदी ऊंसाचें दर एकरीं उत्पादन तिप्पट झालें पाहिजे. कपाशीचे बाबतींत इजिप्तमधील कपाशीचें दर एकरीं उत्पादनाचें प्रमाण हिंदुस्थानाचे मानानें पांचपट आढळतें. हिंदी गव्हाचे दर एकरीं उत्पादन फ्रान्स, इंग्लंड व डेन्मार्क ह्यांतील उत्पादनाच्या बरोबरीचें झालें, तर तेवढ्यानेंच फक्त हिंदी संपत्तींत सालिना अनुक्रमें ६७ कोटि, १ अब्ज व १½ अब्ज रुपयांची भर पडेल, असा सर मॅकडगल ह्यांचा अभिप्राय आहे. ( १ ) जमिनीचा निकृष्टपणा, ( २ ) अपुरा अथवा अनिश्चित पाऊस, ( ३ ) कापणीची असमाधानकारक पद्धति, ( ४ ) शेतीस लागणाऱ्या जनावरांचा व साधनांचा अभाव, (५) जमिनीचे पडलेले लहान लहान तुकडे, ( ६ ) भांडवल मिळण्याची अडचण, ( ७ ) विक्रीची जुनीपुराणी व्यवस्था व ( ८ ) निरक्षर शेतकऱ्यांत उत्साह व धडाडी ह्यांचा अभाव हीं हिंदी जमिनींच्या अपुऱ्या उत्पादनाचीं प्रमुख आठ कारणें आहेत असें " हिंदी खेडेगांवांचा प्रश्न " ह्या आपल्या ताज्या ग्रंथांत सर मणिलाल नानावटी व प्रो. जे. जे. अंजारिया ह्यांनीं म्हटलें आहे.* " पिढ्यांन्‌पिढ्या चालू असलेल्या अधिकाऱ्यांच्या बेफिकिरीच्या धोरणाचे दुष्परिणाम चालू युद्धानें प्रामुख्यानें नजरेस आणले आहेत. त्यामुळें इतर देशांतील गेल्या पन्नास वर्षांतील प्रचंड प्रगतीशीं हिंदुस्थानांतील प्रगतीची तुलना करण्याचें तर राहोच, परंतु आपल्या देशांत जनतेस पोटभर अन्न देणेंहि आज मुष्कील झालें आहे. अपुऱ्या अन्नपुरवठ्यामुळें अर्धपोटीपणा होता, त्याचे भरीस आतां अन्नाच्या प्रत्यक्ष तुटवड्याचें पिशाच्च दिसूं लागलें आहे. निर्गतीची बंदी, तातडीनें ऑस्ट्रेलियांतून व कॅनडांतून आयात, " अधिक धान्य पिकवा " मोहीम, बी पुरवठ्यासाठी किरकोळ मदत इत्यादि उपाय आतां हातीं घेण्यांत आले आहेत, त्यांनीं प्रश्नाचें उग्र स्वरूप कमी झालें तरी तो कायमचा सुटणार नाहीं. सरकारचें धोरणच आमूलाग्र बदललें पाहिजे व सरकार, आणि शेतकऱ्यांच्या उद्धारांत मन घालणाऱ्या खासगी व इतर संस्था आणि सामान्य नागरिक ह्यांनीं कसून प्रयत्न केला पाहिजे." असा पुस्तककर्त्यांचा आग्रह आहे.

शेतीसाठी यंत्रसामुग्रीचा उपयोग प्रतिपादन करतांना, डॉ. बर्न्स म्हणतात कीं मनुष्यबळाची जागा यंत्रांनीं घेतली तर शेतीवर कमी लोकांना काम मिळेल, असेंच केवळ मानण्याचें कारण नाहीं. प्रत्येक कामामागिक कमी माणसें पुरतील, परंतु दर एकरीं पूर्वींइतकींचहि माणसें लागू शकतील. यंत्रसामुग्रीमुळें पुष्कळ नवे धंदे निर्माण होतात. यंत्रें करणें, तीं चालविणें, तीं दुरुस्त करणें, यंत्रांचे सुटे भाग, जळण, ओंगणें, हीं पुरविणें वगैरे धंदेहि निर्माण होतात. एका ठिकाणाहून दुसरीकडे यंत्रें हलविण्याचीं म्हटलीं, म्हणजे रस्तेसुधराई आली व त्यांतहि पुष्कळ माणसांस वाव मिळतो. सुशिक्षित लोकांसहि नवे उद्योगधंदे मिळण्यास वाव प्राप्त होतो. डॉ. बर्न्स ह्यांची ही विचारसरणी कांहीं नवीन नाहीं परंतु, जी गोष्ट इतर ठिकाणीं क्रमप्राप्त ठरते ती हिंदुस्थानांत ठरतेच असें होत नाहीं, ही अनुभवाची गोष्ट आहे. रेल्वेजची वहातुक हिंदुस्थानांत सुरू होऊन इतका काळ लोटला तरी इंजनांचें उत्पादन अद्याप होऊं लागलेलें नाहीं. मोटार बसेसची वहातुक वाढली, तरी त्यांची आयातच करावी लागते व टायर्स, ट्यूब्स, सुटे भाग, पेट्रोल ह्या सर्वांसाठी हिंदुस्थानास परदेशांवर अवलंबून रहावें लागतें. हिंदुस्थानांतील ही परिस्थिति डॉ. बर्न्स ह्यांच्या युक्तिवादाशीं जुळती नाहीं. अर्थात ही भूतकाळची गोष्ट आहे; युद्धोत्तर घडामोडी कदाचित् वेगळ्या स्वरूपांत आपणांस दिसतील. " शेतीचें मोठ्या प्रमाणावर यंत्रीकरण करणें हिंदुस्थानांत कांहीं काळ तरी फारसें फलदायी होणार नाहीं. तथापि आपल्या लहानशा तुकड्यांत उपयोगांत आणतां येतील अशा स्थानिक परिस्थितीस अनुसरून वेगवेगळ्या यंत्रसामुग्रींत सुधारणा घडवून आणण्यास मात्र भरपूर वाव आहे. स्वस्त, हलकीं व सोपीं अवजारें शेतकऱ्यांस हवीं आहेत व तीं उपलब्ध करणाऱ्या योजनांस पाठिंबा दिला पाहिजे " असें सर मणिलाल नानावटी व प्रो. अंजारिया म्हणतात.

---

### मुंबई सरकारच्या नोकरांचे प्रवासाच्या भत्त्यांत वाढ

मुंबई सरकारनें आपल्या नोकरांच्या प्रवासाच्या भत्त्यांत, सध्याची महर्गता लक्षांत घेऊन, वाढ केली आहे. दरमहा ८० रुपये किंवा त्यापेक्षा कमी कायम भत्ता मिळविणारांस सध्याच्या दीडपट भत्ता मिळेल. ८० रुपयांवरील भत्तेवाल्यांच्या भत्त्यांत ३३⅓% वाढ होईल, परंतु प्रत्येकास किमान १२० रुपये प्रवासभत्ता मिळेलच. रस्त्यावरील प्रवासाचे दर मैली दर व रोजी भत्ता ह्यांतहि वाढ केली आहे.

### क्रमिक पुस्तकांच्या किंमतींत वाढ

शाळांच्या क्रमिक पुस्तकांच्या किंमतींत ७०% ते १००% वाढ करण्यास प्रकाशकांना मुंबई सरकारनें परवानगी दिली.

* The Indian Rural Problem पृ. क्र. ४२२, कि. ८ रु.

### देवकरण नानजी इनव्हेस्टमेंट कं. लि.

वरील कंपनी १५ फेब्रुवारी, १९४३ रोजीं नोंदण्यांत आली व तिनें ३० मार्च, १९४३ रोजीं व्यवहारास प्रारंभ केला. देना-सन्स लि. हे कंपनीचे मॅनेजिंग एजंट्स आहेत. कंपनीला पहिल्या वर्षअखेर तिच्या २५ लक्ष रुपये वसूल भांडवलावर ४% करमाफ डिव्हिडंड सुटलें. मॅनेजिंग एजंटांस १४,५४६ रुपये कमिशन मिळालें. भांडवल उभारणीच्या निर्बंधामुळें कंपनी अंडररायटिंगचें काम अपेक्षेइतकें करूं शकली नाहीं.

### ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या वाढविण्याचा प्रयत्न

युद्ध संपल्यावर वहातुकीची सोय होतांच, ऑस्ट्रेलिया, ग्रेट ब्रिटन व युरोप ह्यांतून रहिवासी आणण्यास प्रारंभ करणार आहे. लढाईतून परतलेले सैनिक व लहान मुलें ह्यांस प्राधान्य मिळेल. हजारों लोकांना काम मिळूं शकेल, असा ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानास विश्वास वाटत आहे.

### पावसाळ्यासाठी कोळशाचा साठा

पावसाळ्यांत लागणाऱ्या कोळशाची तरतूद करतां यावी, ह्यासाठी मुंबई शहर व उपनगर ह्यांतील दुकानदारास एकावेळीं नागरिकांना १२ आठवड्यांचा कोळसा देण्याची परवानगी सरकारनें दिली आहे. १५ जून नंतर ही सवलत रहाणार नाहीं.

### नॅशनल वॉर फंडचा नॅशनल वेल्फेअर फंड

युद्धाचे संबंधांत लोकांचा उत्साह कायम राखून मामुली व्यवहारांतील अडचणींचा प्रतिकार करण्यासाठीं नॅशनल वॉर फंडची स्थापना मे १९४२ मध्यें करण्यांत आली. मि. पी. जे. ग्रिफिथ्स हे त्याचें मार्गदर्शन करीत होते ते नुकतेच निवृत्त झाले आहेत. जातीय सलोख्याचा भक्कम पाया स्थापन करण्यानें हें उद्दिष्ट-अधिक चांगलें यशस्वी होऊन त्याचे सुपरिणामहि दीर्घकाळ टिकतील ह्या अपेक्षेनें नॅशनल वॉर फंडचे नॅशनल वेल्फेअर फंड असें नामांतर करण्यांत येऊन त्याचें धोरणहि बदलण्यांत येणार आहे.


## प्रगतीचें श्रेय आपणांकडे

### सह्याद्रि विमा कंपनीनें १९४३ सालीं खालीलप्रमाणें काम केलें आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| आलेलें काम | रु. ११, ४४, ४७१ | १९४१ | ५ लक्ष | ३ हजारानें |
| मंजूर काम | रु. १८, ३५, ७१४ | पेक्षां | १ लक्ष | १० हजारानें |
| पूर्ण विमा काम | रु. १६, १९, ७७५ | वाढ | ४ लक्ष | ७ हजारानें |

या सर्व प्रगतीचें श्रेय कंपनीचे विमेदार, प्रतिनिधी, प्रचाराधिकारी, भागीदार व हितचिंतक यांनाच आहे व त्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत. विमा–योजना त्याचप्रमाणें एजन्सी याच कंपनीची अत्यंत आकर्षक.

नासिक ॥ मॅनेजिंग डायरेक्टर

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

### अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

### महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचें रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ मंडई घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७/११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.